# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

*"Towards Global Technological Excellence"*

दु. . (०७२१) २५३१९२९, २५३१९३०
फॅक्स (०७२१) २५३१९३१

संकेत स्थळ : www.gcoea.ac.in
ई मेल : principal@gcoea.ac.in


**महत्वाची सुचना**

क्र.शाअमअ/अधिष्ठाता (शै)/प्रवेश शुल्क /२०२०/२५०९
दिनांक : ०२/०९/२०२०

संदर्भः- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक: जा.क्र.शाअमअ/२०/वि.वि./२३३७, दि. २१/०८/२०२०
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक शाअमअ/२०/शि.वि./२२६४, दि. १३/०८/२०२०.

वरील संदर्भ क्र. १ च्या पत्राप्रमाणे दिनांक ०१/०९/२०२० पासून दि.०५/०९/२०२० पर्यत रुपये ५००/- दंड आकारुन रजिस्ट्रेशन करावे असे सुचित केले होते. परंतु विद्यार्थ्याच्या अडचणी लक्षात घेता, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता विद्यार्थ्यांनी शुल्क भरुन रजिस्ट्रेशन करण्याकरीता दि. **०५/०९/२०२०** पर्यत कोणत्याही प्रकारचे दंड न आकारता मुदतवाढ देण्यात येत आहे. जे विद्यार्थी उशीरा म्हणजेच दि. **०६/०९/२०२० ते ११/०९/२०२०** पर्यंत शुल्क भरतील अशा विद्यार्थ्याना रुपये ५००/- एवढे अतिरिक्त शुल्क भरावे लागेल,

तसेच उपरोक्त संदर्भ क्र. २ चे पत्रान्वये SEBC/EWS विद्यार्थ्यांना मागील वर्षाची प्रवेश फी रुपये ३४२५०/- भरण्याची मुदत दिनांक **२५/०८/२०२०** पर्यत देण्यात आली होती. परंतु ज्यानी **दि. ३१/०८/२०२०** पर्यत मागील वर्षाची प्रवेश शुल्काची रक्कम भरलेली आहे **अश्याच विद्यार्थ्यांना** दि. **११/०९/ २०२०** पर्यत चालु शैक्षणिक वर्षाची प्रवेश फी चा पहिला हप्ता कोणत्याही प्रकारचे दंड न आकारता भरण्याची परवानगी / मुदतवाढ देण्यात येत आहे. मागील वर्षाची उर्वरीत रक्कम न भरता, चालु सत्राची जरी फी भरली तरी प्रवेश निश्चित केला जाणार नाही.

विद्यार्थ्यांना असेही कळविण्यात येते की, विद्यार्थीनी रितसर पहिला हप्त्याची (First Installament) प्रवेश फी भरल्यानंतरच त्याचा तात्पुरता प्रवेश (Provisional Admision) झाल्याची नोंद करता येईल. अन्यथा त्यांना कोणत्याही प्रकारचे चालु शैक्षणिक वर्षाचे प्रमाणपत्र देण्यात येणार नाहीत (उदा. Bonafite Certificate, Expendituer, Grade Card )

सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त विहीत मुदतीत प्रवेश फी भरुन आपले प्रवेश निश्चित करावा. दिनांक ११/०९/२०२० नंतर कोणतेही रजिस्ट्रेशन/ प्रवेश नोंदणी केल्या जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
अमरावती.

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
२) सर्व वर्ग प्रतिनिधी सदर सुचना संबधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या Whats app group व्दारे द्यावी.
३) सुचना फलक, मुख्य इमारत, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
४) डाटा सेंटर, शा. अभि. महा. अमरावती (महाविद्यालयाच्या वेब साईटवर अपलोड करण्याकरीता)
५) रोखपाल शा. अभि. महा. अमरावती यांना आवश्यक कार्यवाही करीता रवाना.